लोकमत HELLO नवी मुंबई

बुधवार, दि. ८ डिसेंबर २०१०

### ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांविषयी

# मुख्यमंत्र्यांची सकारात्मक भूमिका

**नवी मुंबई, दि. ७ (प्रतिनिधी)** - ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न कळीचा मुद्दा बनला आहे. या गंभीर समस्येवर शासनाकडून सकारात्मक निर्णय घेण्याबाबत विचारविमर्श सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली. ऐरोली मतदारसंघाचे आमदार संदीप नाईक यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली आहे. यावरून जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात ठाणे जिल्ह्यात सुमारे पाच लाख अतिक्रमणे आहेत. यापैकी नवी मुंबई विभागात २३ हजार ३३२ अतिक्रमणे असल्याचे स्पष्ट झाले आहे. या अतिक्रमणांना संबंधित विभागाकडून जुलै आणि ऑक्टोबर २०१० मध्ये नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच काही भागात अनधिकृत बांधकामे पाडण्याची प्रत्यक्ष कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अनेकांवर बेघर होण्याची पाळी आली आहे. माणुसकीच्या दृष्टिकोनातून ही कारवाई थांबविण्याची मागणी विविध राजकीय पक्षांनी तथा सामाजिक संघटनांनी केली आहे. आमदार नाईक यांचा यासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. उल्हासनगरच्या धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे नियमित करावित, अशी आग्रही मागणी नाईक यांनी शासनाकडे केली आहे. १ जानेवारी २००० नंतरच्या अनधिकृत बांधकामांविषयी शासनाचे काय धोरण आहे, या बांधकामातून राहणाऱ्या लाखो गरीब कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे, असे प्रश्न नाईक यांनी शासनाला विचारले होते. ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांची व्याप्ती मोठी असल्याचे मुख्यमंत्री चव्हाण यांनी मान्य केले आहे. यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आपल्या लेखी उत्तरात म्हटले आहे. तसेच १ जानेवारी, २००० ते २०१० पर्यंतची सर्व बांधकामे नियमित करण्याची मागणी नाईक यांनी शासनाकडे केली होती. २ मार्च, २००९ च्या शासन निर्णयानुसार उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. तशा सूचना संबंधित शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.



दरम्यान, जोपर्यंत यासंदर्भात निश्चित धोरण ठरत नाही, तोपर्यंत अनधिकृत बांधकामे तोडण्याच्या कारवाईला स्थगिती द्यावी, अशी मागणी आमदार नाईक यांनी केली आहे. २०१० पर्यंतची सर्व विनापरवाना बांधकामे नियमित व्हावीत, या मागणीसाठी शासनाकडे आपला पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.